शासकीय वाहन चालकांना देण्यात
येणा-या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ.

**महाराष्ट्र शासन,**
वित्त विभाग,

शासन निर्णय क्रमांक : अकाभ-१३०४/प्र.क्र.१८/सेवा-८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक : १६ ऑगस्ट, २००४.

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक जीसीएस-१३८०/सीआर-११११/एसईआर-९, दिनांक २६ एप्रिल, १९८२.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अकाभ-१३९०/सीआर-३४/एसईआर-९/, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अकाभ-१३९३/१०९/सेवा-९/, दिनांक २९ मार्च, १९९५.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अकाभ-१३९५/१७/सेवा-९/, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५.

**शासन निर्णय :-** सध्या, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अकाभ-१३९३/१०९/सेवा-९/, दिनांक २९ मार्च, १९९५ नुसार शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळ्या कार्यालयातील वाहन चालकांना विहित ९ तासांच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम केल्यास खालील शर्तीच्या अधीन राहून रु. ८/- प्रति तास या दराने अतिकालिक भत्ता मंजूर करण्यात येतो.

१. कामाच्या दिवशी ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास (भोजन समय धरुन) आणि रविवार व सुटीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला रु. ८/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल.)

२. वाहन चालकास एका महिन्यात मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगाराच्या (Salary) ५०% पेक्षा जास्त असू नये.

२. वाहन चालकांना मिळणा-या अतिकालिक भत्त्याच्या वर नमूद केलेल्या प्रचलित दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, वाहन चालकांना देण्यात येणा-या अतिकालिक भत्त्याचा सध्याचा रु. ८/- प्रति तास हा दर पूर्वीप्रमाणेच वर नमूद केलेल्या शर्तीच्या अधीनतेत राहून रु. २०/- (रुपये वीस मात्र) प्रति तास असा सुधारित करण्यात यावा.

३. वाहन चालकांना सुधारित दराप्रमाणे अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणेच वाहन चालक त्यांचे नियंत्रणाखाली काम करतात त्या विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना राहतील.

(कृ. मा. प.)

H-596 (13000-40-8-04)1

४. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. सुधारित दराप्रमाणे येणारा खर्च संबंधित विभागाच्या / कार्यालयाच्या त्या त्या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अनघा परब
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
• प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
• प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
• प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
• सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
• सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
वित्त विभागातील सर्व कार्यासने (ग्रंथपाल ५ प्रती)
निवड नस्ती, कार्यासन सेवा-८.

-------------

* पत्राने.

------------

H-598 (13000+40-8-04) 13